महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा - २०२४
पेपर क्रमांक - १ . दि. २९ जून २०२५

**2024**

**N20**

| प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. |
|---|
| 208477 |

संच क्र. **A**

# प्रश्नपुस्तिका – I
## मराठी व इंग्रजी

**वेळ : 1 (एक) तास**

**एकूण प्रश्न : 100**
**एकूण गुण : 200**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

### ताकीद

ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी, प्राधिकृत केलेली, नेमलेली किंवा कर्तव्ये सोपविलेली कोणतीही व्यक्ती, प्रश्नपुस्तिका उघडण्यासाठी व वितरित करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी अशी प्रश्नपत्रिका किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिची प्रत उघडणार नाही, फोडणार नाही किंवा ताब्यात घेणार नाही किंवा पाहणार नाही किंवा सोडविणार नाही किंवा सोडविण्यास सहाय्य करणार नाही; असे केल्यास "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गांस प्रतिबंध) अधिनियम २०२४" मधील तरतुदीनुसार सदर व्यक्ती तीन वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु, जी पाच वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. अवकृपा, अवगणना, अवगत, अवगुण या शब्दांतील 'अव' हा उपसर्ग पुढीलपैकी कोणत्या भाषेतून आला आहे ?

(1) फारसी
(2) संस्कृत
(3) अरबी
(4) उर्दु

---

2. ''च्यवनप्राश म्हणजे साक्षात बलच'', हे उदाहरण कोणत्या शब्दशक्तीचे आहे ?

अ. शुद्धा उपादान
ब. शुद्धा सारोया
क. लक्षणलक्षणा
ड. शुद्धा साध्यवसाना

(1) अ आणि ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

---

3. ''शब्द उच्चारताच विशिष्ट आकृती वा वस्तू आपल्या मनचक्षुपुढे येते'', त्या शब्दशक्तीला काय म्हंटले जाते ?

अ. अभिधा
ब. लक्षणा
क. व्यंजना
ड. लक्षणलक्षणा

(1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) क आणि ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

---

**4.** पुढीलपैकी कोणते शब्द प्रमाणलेखन नियमानुसार बरोबर आहेत ?

a. उपाहारगृह, कोट्यवधी, माहात्म्य, आलंकारिक

b. उपहारगृह, कोट्यावधी, माहात्म्य, आलंकारीक

c. उपाहारगृह, कोट्यवधी, महात्म्य, अलंकारिक

d. उपाहरगृह, कोट्यवधी, माहत्म्य, आलंकारीक

(1) b आणि c फक्त बरोबर

(2) a फक्त बरोबर

(3) d फक्त बरोबर

(4) a आणि c बरोबर

---

**5.** शत्रूंची सैन्ये <u>समोरासमोर</u> तळ ठोकून होती. या वाक्यातील अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा.

(1) प्रत्ययघटित शब्द

(2) अंशाभ्यस्त शब्द

(3) पूर्णाभ्यस्त शब्द

(4) उपसर्गघटित शब्द

---

**6.** 'माझ्याने हे काम होणार नाही' हे वाक्य खालीलपैकी कोणत्या प्रयोगाचे उदाहरण आहे ?

(1) प्रधान कर्तृक कर्मणी प्रयोग

(2) गौण कर्तृक कर्मणी प्रयोग

(3) नवीन कर्मणी प्रयोग

(4) शक्य कर्मणी प्रयोग

---

**7.** हत् ! किती बेचव आंबा आहे ! या वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) विधानार्थी (2) प्रश्नार्थी

(3) उद्गारार्थीहोकारार्थी (4) उद्गारार्थी नकारार्थी

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**8.** पुढीलपैकी मिश्र वाक्य कोणते ?

a. तो गावाला गेला.

b. मी परमेश्वराला वंदन करतो.

c. जो मुलगा अभ्यास करणार नाही तो पास होणार नाही.

d. सूर्य बराच वर आलाय; पण तो ढगांनी व्यापला आहे.

(1) a फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(2) b फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(3) c फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(4) d फक्त बरोबर बाकी सर्व चूक

---

**9.** 'पाऊस पडला असता तर पीके चांगली आली असती.' हे वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ?

(1) स्वार्थी वाक्य

(2) आज्ञार्थी वाक्य

(3) विध्यार्थी वाक्य

(4) संकेतार्थी वाक्य

---

**10.** खालील वाक्याचा प्रकार ओळखा.

'बोलणाऱ्याची मातीसुद्धा विकली जाते, पण न बोलणाऱ्याचे सोनेही पडून राहते.'

(1) केवल वाक्य (2) संयुक्त वाक्य

(3) प्रधान वाक्य (4) मिश्र वाक्य

---

**11.** सुदेशची टवाळी करणे रमेश कधी बंद करेल ? शब्दसमूहासाठी योग्य वाक्प्रचार असलेला पर्याय ओळखा.

a. खोड काढणे

b. बट्टा लावणे

c. टोपी उडविणे

d. प्रतारणा करणे

(1) a फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(2) b फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(3) c फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(4) d फक्त बरोबर बाकी सर्व चूक

12. जीव मुठीत धरणे. या वाक्प्रचाराच्या समानार्थी वाक्प्रचाराचा अचूक पर्याय ओळखा.

a. गर्भ गळित होणे.

b. अंगावर काटा उभा राहणे.

c. फेफे वळणे.

d. बोबडी वळणे.

(1) a व c बरोबर b व d चूक

(2) b व d बरोबर a व c चूक

(3) a, b व d बरोबर c फक्त चूक

(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

---

13. पुढील समानार्थी वाक्प्रचारातील चुकीच्या जोड्या ओळखा.

अ. पाणी पाजणे – तहान भागविणे

ब. डोक्यावर मिऱ्या वाटणे – डोक्यावर बसणे

क. हातमिळवणी करणे – नमस्कार करणे

ड. आकाशपाताळ एक करणे – अकांडतांडव करणे

(1) अ व ब बरोबर

(2) अ व ड बरोबर

(3) अ व क बरोबर

(4) ब, क व ड बरोबर

---

14. 'संघाला आलेल्या अपयशाचा सारा दोष' नियामक मंडळाने कर्णधाराला दिला.
या वाक्यातील अधोरेखित शब्दातील आशय सूचित करणारा वाक्प्रचार ओळखा.

(1) खोड मोडणे (2) खूणगाठ बांधणे

(3) खो घालणे (4) खापर फोडणे

---

15. 'माहिती असूनही काहीच माहिती नाही' असे दाखविणे या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा.

(1) कानावर हात ठेवणे (2) कानावर पडणे

(3) कानउघडणी करणे (4) कान फुंकणे

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**16.** म्हण पूर्ण करा.

'घर सारव तर म्हणते......'

(1) शेणच नाही

(2) अंगण वाकडे

(3) कोनाडे किती

(4) आज नको उद्या करते

---

**17.** 'उचलली जीभ, लावली टाळ्याला' या म्हणीचा योग्य अर्थाचा पर्याय निवडा.

(1) विचार न करता बोलणे

(2) घशाला कोरड पडणे

(3) एकसारखे बोलत राहणे

(4) काहीच न बोलता गप्प राहणे

---

**18.** म्हण पूर्ण करा.

'ज्याचं करायला जावं भलं ..........'

(1) 'त्याचच होतं भलं'

(2) 'तो म्हणतो माझंच खरं'

(3) 'तो म्हणतो तुझंच खरं'

(4) 'त्यालाच वाटतं भलं'

---

**19.** 'दिव्याखाली अंधार' या म्हणीचा अर्थ ओळखा.

अ. दिवा लावल्याशिवाय अंधार जात नाही.

ब. मोठया माणसाच्या ठिकाणी दोष हे असतातच.

क. दिवा वर तर अंधार खाली असतो.

ड. अंधार घालविण्यासाठी दिवा लावला जातो.

(1) अ व क बरोबर

(2) फक्त ब बरोबर

(3) ब व ड बरोबर

(4) अ व ड बरोबर

---

**20.** 'पाचशे रुपये ही काही लहान रक्कम नव्हे' या वाक्याचे होकारार्थी वाक्यात रूपांतर कसे होईल ?

(1) पाचशे रुपये ही खूप लहान रक्कम नाही

(2) पाचशे रुपये ही देखील मोठी रक्कम आहे

(3) पाचशे रुपये ही मुळीच लहान रक्कम नाही

(4) पाचशे रुपये ही काही लहान रक्कम नसते

---

**21.** उपसर्गसाधित शब्दांचे अचूक पर्याय ओळखा.

a. अतिशय, आकर्षक, नास्तिक, प्रताप.

b. अनुरूप, उद्देश, पराजय, सुकाळ.

c. उपयोग, अपराध, सुलभ, विजय.

d. नियुक्त, दुर्जन, अवजड, अवमान.

(1) a व c बरोबर b व d चूक

(2) b व d बरोबर a व c चूक

(3) a, b व d बरोबर c फक्त चूक

(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

---

**22.** लाडीगोडी, ओळखदेख ही अभ्यस्त शब्दांच्या कोणत्या प्रकारची उदाहरणे आहेत ? अचूक पर्याय ओळखा.

a. पुर्णाभ्यस्त

b. अंशाभ्यस्त

c. अनुकरणवाचक

d. कृदंत

(1) a फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(2) b फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(3) c फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(4) d फक्त बरोबर बाकी सर्व चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**23.** 'गुण' शब्दाचे विविध अर्थ असलेले शब्द वापरून बनविलेली अचूक वाक्य कोणती ?

a. राम सद्‌वर्तनी पुरुष होता.

b. कारले कडूच, त्याचा मुळ स्वभाव जाणार नाही.

c. संगीताने दहावीत चांगले अंक मिळविले.

d. सुमनच्या हाती पाळण्याची दोरी आली.

(1) a फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(2) b व c बरोबर a व d चूक

(3) a, b व c बरोबर d फक्त चूक

(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

---

**24.** 'देवालय' या शब्दात संधीचा कोणता प्रकार आहे ?

(1) सजातीय संधी

(2) विसर्ग संधी

(3) विजातीय संधी

(4) पूर्वरूप संधी

---

**25.** 'य' हा वर्ण पुढीलपैकी कोणत्या गटात बसतो ?

(1) कंठ्य

(2) अर्धस्वर

(3) तालव्य

(4) दंत्य

---

**26.** सुरेश गीत गातो. या वाक्याचे रीतिकाळात अचूक रूपांतर असलेले वाक्य कोणते ?

a. सुरेशने गीत गाइले.

b. सुरेश गीत गात आहे.

c. सुरेश गीत गात असतो.

d. सुरेश गीत गात असेल.

(1) a व d बरोबर b व c चूक

(2) b व c बरोबर a व d चूक

(3) a व b बरोबर c व d चूक

(4) c व d बरोबर a व b चूक

---

**27.** खालील शब्दायोगी अव्ययांच्या योग्य जोड्यांचे अचूक पर्याय ओळखा.

a. करणवाचक - ठायी, पाशी, नजीक, समीप

b. हेतुवाचक - शिवाय, खेरीज, विना, वाचून

c. दिक्वाचक - बद्दल, ऐवजी, जागी, बदली

d. कैवल्यवाचक - सह, संगे, सकट, सहित

(1) a व d बरोबर b व c चूक

(2) b व c बरोबर a व d चूक

(3) a, c व d बरोबर b फक्त चूक

(4) सर्व पर्याय चूक आहेत

---

**28.** कळत, नकळत, येऊन, जाऊन ही क्रियाविशेषणे पुढीलपैकी कोणत्या प्रकारातील आहेत ?

(1) स्थानिक क्रियाविशेषण

(2) विशेषणसाधित क्रियाविशेषण

(3) धातुसाधित क्रियाविशेषण

(4) नामसाधित क्रियाविशेषण

---

**29.** 'लागी' हे पुढीलपैकी कोणत्या प्रकारातील शब्दयोगी अव्यय आहे ?

(1) करणवाचक (2) कैवल्यवाचक

(3) दिक्वाचक (4) भागवाचक

---

**30.** वकिली, सौंदर्य, दास्य, गारवा ही कोणत्या प्रकारची नामे आहेत ?

(1) सामान्य नामे (2) विशेष नामे

(3) भाववाचक नामे (4) समूहवाचक नामे

---

**31.** पुढीलपैकी कोणते वाक्य केवल वाक्य नाही ?

(1) वारा आला.

(2) रामभाऊंच्या कुंदाने काल बाजारातून हिरवे कागद आणले.

(3) कनकमल शेटजींच्या घरावर काल दरोडा पडला.

(4) हे पुस्तक फाटकेच होते हे मला आता आठवले.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**32.** 'मी एकही पत्र तुम्हाला अलीकडे लिहिले नाही' या वाक्यातील कर्म, विधेयपूरक व विधेयविस्तार हे घटक कोणते ?

(1) एकही - अलीकडे - लिहिले

(2) मी - पत्र - लिहिले नाही

(3) पत्र - तुम्हाला - अलीकडे

(4) तुम्हाला - अलीकडे - नाही

---

**33.** 'संजनाला आईची आठवण येते', 'तिचा कंठ दाटून येतो' या दोन केवलवाक्यांचे मिश्र वाक्यात रूपांतर करा.

(1) संजनाला आईची आठवण येते व तिचा कंठ दाटून येतो.

(2) संजनाला आईची आठवण येते, तेव्हा तिचा कंठ दाटून येतो.

(3) संजनाला आईची आठवण येते आणि तिचा कंठ दाटून येतो.

(4) संजनाला आईची आठवण आल्यामुळे तिचा कंठ दाटून येतो.

---

**34.** 'हा आंबा चांगला निघाला.' या वाक्यातील 'पूरक' शब्द कोणता ?

a. हा

b. आंबा

c. चांगला

d. निघाला

(1) a फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(2) b फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(3) c फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(4) d फक्त बरोबर बाकी सर्व चूक

---

**35.** चित्रपटातील नायकाप्रमाणे दिसण्यासाठी शरीराला न झेपणारा अति व्यायाम केल्याने समीरला खूपच दुखापत झाली. या अर्थाची योग्य म्हण ओळखा.

(1) अति उदार तो सदा नादार

(2) अति राग भीक माग

(3) अति शहाणा त्याचा बैल रिकामा

(4) अति तेथे माती

---

**पुढील उतारा वाचून प्रश्न क्र. 36 ते प्रश्न क्र. 40 सोडवा.**

राष्ट्रवादाची प्रेरणा ही आधुनिक युगात सर्वत्र प्रभावी ठरली असली,तरी त्याचा आशय सगळीकडे एकच होता असे नाही. त्या त्या देशातील परिस्थितीप्रमाणे त्याचे स्वरूप वेगवेगळे बनले होते. शिवाय कुठल्याच देशातील राष्ट्रवाद अगदी एकजिनसी आहे असे आढळत नाही. त्यात वेगवेगळे अंत:प्रवाह दृष्टीस पडतात. भारतीय राष्ट्रवादाच्या जडण-घडणीतही याच गोष्टीचा आपल्याला प्रत्यय येतो. ऐतिहासिक परंपरेपासून स्फूर्ती घेणारा चिपळूणकर-टिळकांचा जहाल लढाऊ राष्ट्रवाद, समन्वयशील नेमस्त उदारमतवादावर आधारलेला रानडे-गोखले यांचा प्रागतिक राष्ट्रवाद ही आपल्या राष्ट्रवादाची महाराष्ट्रातील दोन भिन्न रूपे सर्वांच्या परिचयाची आहेत. आगरकरांचा राष्ट्रवादी विचारसंप्रदाय या दोहोंहून तत्त्वत: खासच निराळा होता. वास्तवलक्षी, विवेकनिष्ठ व्यक्तिवाद हे त्यांच्या राष्ट्रविषयक विचारांचे प्राणतत्व होते. विशिष्ट भूप्रदेश हे राष्ट्राचे बाह्यांग होय. राष्ट्राच्या उत्कर्षापकर्षाच्या संदर्भात त्याला देखील महत्त्व आहे. पण देशातील हाडामांसाची जिवंत माणसे हेच त्याचे खरेखुरे अंतरंग, वास्तविक जीवनसत्त्व; म्हणूनच अमूर्त राष्ट्रकल्पनेचा उदोउदो त्यांना श्रेयस्कर वाटत नव्हता. व्यक्तिप्रेरणेला गौण लेखणाऱ्या परंपरावादाला त्यांचा विरोध होता. त्यामुळे राष्ट्रहित आणि लोककल्याण हे शब्द त्यांनी प्राय: समानार्थी म्हणून वापरले आहेत. पारतंत्र्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला असल्यांमुळे आपल्या देशातील विचारवंतांना सामान्यत: आक्रमक राष्ट्रवादाचे आकर्षण नव्हते. आगरकरांच्या राष्ट्रनिष्ठेत अर्थातच संकुचित स्वार्थबुद्धीचा, तत्त्वशून्य मिथ्याभिमानाचा लवलेशही नव्हता. ग्लॅडस्टन, रिपन, ब्राइट, ब्रॅडलॉ, ह्यूम अशा उदारमतवादी, मुत्सद्दयांचे व चिंतकांचे आदर्श त्यांच्या डोळ्यांपुढे होते. आपल्या देशाचे हित हे जगाच्या हिताशी सुसंवादी असले पाहिजे; त्यांत मूलभूत विरोध असण्याचे कारण नाही. अखिल मानव-जातीचे सुख आणि स्वास्थ्य हेच आपले अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. ते साध्य करून घ्यावयाचे तर प्रथम राष्ट्र म्हणून जगात आपली प्रतिष्ठा राहिली पाहिजे. 'जीवितं मरणाच्छ्रेयो जीवन्धर्ममवाप्नुयात्' आधी जगणे आणि मग ध्येयसाधना हा न्याय व्यक्तीप्रमाणेच समाजालाही लागू पडतो. निर्घृण जीवनकलहात भारतीय समाज टिकून राहिला पाहिजे, तरच स्वत:चा उत्कर्ष साधून जगाच्या प्रगतीला तो हातभार लावू शकेल. या दृष्टीने इतिशासक्रमातून सिद्ध झालेल्या आणि सर्वत्र स्थिरावलेल्या राष्ट्रकल्पनेचा त्यांनी जाणीवपूर्वक स्वीकार केला होता. त्यामुळे साहजिकच माणूस हा त्यांच्या समग्र विचाराचा मध्यबिंदू ठरला. 'मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन' हाच सार्वत्रिक भावी धर्म आहे अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. त्यांनी स्वत: तर या विशुद्ध व कल्याणप्रद धर्माची दीक्षा घेतलीच, पण जन्मभर निरलसपणे त्याचा प्रसार करण्यात धन्यता मानली.

**36.** स्वातंत्र्यपूर्वकाळात महाराष्ट्रात राष्ट्रवादी विचारप्रवाह किती होते ?

a. एक
b. दोन
c. तीन
d. चार

(1) a आणि b फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(2) b फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(3) c फक्त बरोबर बाकी सर्व चूक
(4) c आणि d फक्त बरोबर बाकी सर्व चूक

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**37.** वास्तवलक्षी, विवेकनिष्ठ व्यक्तिवाद हे कोणाच्या राष्ट्रविषयक विचारांचे प्राणतत्त्व होते ?

a. टिळक

b. आगरकर

c. चिपळूणकर

d. रानडे

(1) a फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(2) b फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(3) b आणि c फक्त बरोबर बाकी सर्व चूक

(4) d फक्त बरोबर बाकी सर्व चूक

---

**38.** आगरकरांसमोर कोणता जागतिक आदर्श होता ?

(1) निखळ राष्ट्रवादाचा
(2) समाजवादाचा
(3) उदारमतवादाचा
(4) लोककल्याणाचा

---

**39.** आगरकरांच्या विचारांचा मध्यबिंदू __________ होता. रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

a. राष्ट्रहित व लोककल्याण

b. निखळ राष्ट्रवाद

c. राष्ट्राची प्रतिष्ठा

d. केवळ माणूस

(1) a फक्त

(2) b फक्त

(3) c आणि d फक्त

(4) d फक्त

---

**40.** वरील उतारा वाचून आगरकरांना कोणती उपाधी देणे समर्पक ठरेल ?

(1) प्रेरक व्यक्तिमत्त्व

(2) बुद्धिवादी समाज सुधारक

(3) वास्तवलक्षी नेता

(4) राष्ट्रनिष्ठ व्यक्ती

---

**41.** एकारान्त पुलिंग नामांचे सामान्यरूप

(1) उ-कारान्त होते

(2) ओ-कारान्त होते

(3) या-कारान्त होते

(4) वा-कारान्त होते

**42.** योग्य जोड्या जुळवा.

| | अगर | | बगर |
|---|---|---|---|
| a. | अर्धविराम | I. | दोन शब्द जोडतांना |
| b. | स्वल्पविराम | II. | दोन छोटी वाक्य जोडण्यासाठी |
| c. | अपूर्णविराम | III. | एकाच जातीचे अनेक शब्द आल्यास |
| d. | संयोगचिन्ह | IV. | वाक्याच्या शेवटी तपशील देण्यासाठी |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | IV | I |
| (2) | I | II | III | IV |
| (3) | I | III | IV | II |
| (4) | II | IV | III | I |

**43.** पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

a. भावे प्रयोगात क्रियापदाचे रूप कर्ता किंवा कर्म यांच्या लिंग-वचन पुरुषाप्रमाणे बनलेले असते.

b. भावे प्रयोगात क्रियापदाचे रूप तृतीयपुरुषी नपुंसकलिंगी एकवचनी असते.

c. भावे प्रयोगात कर्ता तृतीयान्त किंवा चतुर्थ्यन्त असतो.

(1) फक्त a बरोबर

(2) फक्त b बरोबर

(3) फक्त a आणि c बरोबर

(4) फक्त b आणि c बरोबर

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**44.** स्वरांचे प्रकार व त्यांच्या व्याख्या यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | ऱ्हस्व स्वर | i. | दोन स्वर एकत्र येऊन बनलेले स्वर |
| ब. | संयुक्त स्वर | ii. | भिन्न उच्चारस्थानातून निघणारे स्वर |
| क. | सजातीय स्वर | iii. | स्वरांचा उच्चार करण्यास कमी वेळ |
| ड. | विजातीय स्वर | iv. | एकाच उच्चारस्थानातून निघणारे स्वर |

(1) अ – iv ब – iii क – ii ड – i

(2) अ – iii ब – i क – iv ड – ii

(3) अ – iii ब – iv क – i ड – ii

(4) अ – ii ब – iii क – i ड – iv

---

**45.** अगं, अरे, अहो, ए ही कोणत्या प्रकारची केवलप्रयोगी अव्यये आहेत ?

(1) संमतिदर्शक

(2) प्रशंसादर्शक

(3) संबोधनदर्शक

(4) मौनदर्शक

---

**46.** 'शेतात बांधलेली पडवी' या शब्दसमूहाबद्दल योग्य तो पर्याय निवडा.

(1) पाणंद (2) पाणथळ

(3) पडळ (4) पागा

---

**47.** खालीलपैकी तद्भव शब्दांचा गट ओळखा.

a. कर्ण, चक्र, अग्नि, पर्ण

b. कान, चाक, आग, पान

c. गृह, पद, ग्राम, दुग्ध

d. घर, पाय, गाव, दुध

(1) फक्त a आणि b बरोबर

(2) फक्त b आणि c बरोबर

(3) फक्त c आणि d बरोबर

(4) फक्त b आणि d बरोबर

---

**48.** 'हालअपेष्टा सहन करण्याचा गुण' या शब्दासमूहासाठी खालीलपैकी योग्य शब्द कोणता ?

(1) कष्टाळूपणा (2) तितिक्षा

(3) हलाखीचे जीवन (4) परिश्रम

**49.** खालीलपैकी विरुद्धार्थी अयोग्य शब्द जोडी ओळखा.

अ. दातृत्व × नेतृत्व

ब. दांभिक × प्रामाणिक

क. थिटा × लांब

ड. दमट × उष्ण

(1) ब व ड अयोग्य जोडी

(2) फक्त ड अयोग्य जोडी

(3) फक्त अ अयोग्य जोडी

(4) अ व ड अयोग्य जोडी

**50.** खालीलपैकी कोणत्या गटातील शब्द 'तत्सम' आहेत ?

अ. कंबर, चिमणी, बाजरी

ब. कवी, ग्रंथ, जल

क. परंतु, भूगोल, उत्सव

ड. घर, सासरा, भाऊ

(1) फक्त अ व ब बरोबर

(2) फक्त ब व क बरोबर

(3) फक्त ब व ड बरोबर

(4) फक्त अ व ड बरोबर

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**51.** Fill in the blank with the correct option given below.

I managed to get to sleep _________ there was a lot of noise.

(1) although (2) inspite of

(3) because (4) because of

---

**52.** Choose the correct tense of the verb given in the bracket and complete the sentence.

The police _________ (catch) the thief last night.

(1) caught (2) will catch

(3) shall be catching (4) would catch

---

**53.** Choose the right alternative to fill in the blank of the given sentence.

'He got over his enemy by _________ means.'

(1) artistic (2) artful (3) artical (4) artage

---

**54.** Find out the correct meaning of the underlined idiom in the given sentence.

'We <u>called off</u> the match immediately after half time.'

(1) Cancelled (2) Rearranged

(3) Started (4) Planned

---

**55.** Choose the word which is opposite in the meaning of following word.

'Plenty'

(1) Private (2) Scarcity (3) Chief (4) Lower

---

**56.** The interjection 'Hi' expresses

a. Surprise

b. Call for attention

c. Shock

d. Relief

(1) d only

(2) a only

(3) c only

(4) b only

---

**57.** Identify from the following the sentence with correct use of preposition.

a. She has been teaching in this college from 2001.

b. She has been teaching in this college since 2001.

c. She has been teaching in this college before 2001.

d. She has been teaching in this college for 2001.

(1) c only

(2) a only

(3) d only

(4) b only

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

58. Choose from the following alternatives the word which is synonymous in meaning with "false".

(1) real

(2) true

(3) untrue

(4) realistic

---

59. Fill in the blank in the following sentence with suitable word given below it.

'She wanted to buy ___________ books.'

(1) some

(2) any

(3) neither

(4) each

---

60. Choose the correct form of the future continuous tense in the following sentence.

'Even two hours from now she _________the letters.'

(1) will type

(2) will be typing

(3) will have been type

(4) shall have typed

---

61. Find out the exact meaning of the given word.

"Inevitable"

(1) That which cannot be attacked

(2) That which cannot be understood

(3) That which cannot be heard

(4) That which cannot be avoided

---

**62.** Fill in the blank with the correct option.

The United States of America _____of people of all nationalities.

(1) consist

(2) consisting

(3) have consisted

(4) consists

---

**63.** Find out the correct parts of speech of underlined words in the following sentences.

a. <u>All</u> is now lost.

b. <u>All</u> men are mortal.

c. He spilled coffee <u>all</u> over himself.

d. They <u>all</u> live together in the same house.

(1) a – Noun, b – Adjective, c – Adverb, d – Pronoun

(2) a – Pronoun, b – Adjective, c – Adverb, d – Noun

(3) a – Noun, b – Adverb, c – Adjective, d – Pronoun

(4) a – Pronoun, b – Adverb, c – Adjective, d – Noun

---

**64.** Identify the parts of speech of the underlined word in the following sentence.

'I ate <u>some</u> rice.'

(1) pronoun

(2) adjective

(3) preposition

(4) adverb

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**65.** Fill in the blank with appropriate preposition from the options given below.

'A fair little girl sat ______ a tree.'

(1) over

(2) under

(3) with

(4) into

---

**66.** The word 'exotic' stands in antonymous relationship with the word

a. enthusiastic

b. exciting

c. indigenous

d. implicit

(1) d only (2) c only (3) a only (4) b only

---

**67.** 'The meeting will break up after the President has addressed the audience'.

The underlined phrase in the above sentence means

a. interrupt

b. stop and continue after interval

c. divide and end

d. disperse ; dissolve

(1) c only (2) d only (3) b only (4) a only

---

**68.** The word ____________ is correctly synonymous with the word 'ubiquitous'.

a. general
b. universal
c. transparent
d. omnipresent

(1) c only (2) d only (3) b only (4) a only

---

**69.** Choose the correct option to fill in the blank in the following sentence.
A good ________________ who is able to get the best from those placed under his charge.

(1) Disciplenarian (2) Disciplinearin
(3) Disiplinarian (4) Disciplinarian

---

**70.** Fill in the blank by using the correct future tense.
Don't worry ___________ late tonight.

(1) if I am (2) when I am
(3) when I'll be (4) if I'll be

---

**71.** Choose the correct one word substitute for the following :
"One who looks at the bright side of things."

(1) optimist
(2) pessimist
(3) cynic
(4) humanist

---

**72.** Choose the word/s to define the following sentence.
'One who eats too much.'

a. Glutton
b. Hungry
c. Anxious
d. Hypocrite

(1) Only a
(2) b and c
(3) Only c
(4) Only d

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**73.** Choose the correct figure of speech in the following sentence.

'He is one of the three pillars of our organisation.'

(1) Simile

(2) Paradox

(3) Alliteration

(4) Metaphor

---

**74.** Choose the correct word for idiomic phrase – 'Out of question'.

(1) Outside

(2) Impossible

(3) Easy

(4) Mannerless

---

**75.** Choose the idiom that means "to achieve success without any obstacles or difficulties".

(1) Have an axe to grind

(2) Smooth sailing

(3) Drop the ball

(4) Barking up the wrong tree

---

**Read the following passage carefully and answer the questions from 76-80 given below :**

Let us explore some of the key programming languages that are used for developing Artificial Intelligence (AI) and Machine Learning (ML). Prolog is a logic programming language that is well-suited for certain types of AI applications such as expert systems and natural language processing. Released in 1971, Prolog is actively used today, though not at the same scale as many other programming languages. For example-one of the languages used to develop IBM Watson is Prolog. You can execute Prolog programmes in your system by using a compiler called GNU Prolog. It can be installed in Ubuntu by using the command '*sudo apt install gprolog*'. Prolog is worth considering as a potential candidate for AI development due to its unique programming paradigm. However, keep in mind that this language is used sporadically and the chances of coming into contact with a professional Prolog programmer are slim.

Lisp is another historically (being the second oldest surviving high-level programming language) and practically relevant programming language for AI development. Although Lisp is not widely used as some other programming languages, it continues to have a dedicated community of developers who value its unique features and capabilities. Nowadays, Lisp has several dialects available such as Clojure, Scheme, Racket and Common Lisp. Common Lisp is presently one of the most popular dialects of Lisp and SBCL (Steel Bank Common Lisp) is the most commonly used implementation of it. SBCL is an open source implementation known for its quick performance and high level of conformity to the Common Lisp standard. Haskell, a true functional programming language and Scala which provides many functional programming capabilities, are also frequently utilized for creating AI and machine learning applications. Lisp, Haskell and Scala are significant because of the paradigm they support. Python does support some functional features but it is not enough.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

The programming languages like Java and C++ are considered for developing AI when requirement of speed, low-level control and scalability come into the picture. R is a programming language for statistical computing and preferred over Python when strong statistical computing capabilities are required. Scilab is a numerically-oriented programming language and a free and open source numerical computational package. Scilab is an excellent tool for developing AI and machine learning-based applications due to its ease of learning and rich set of libraries. GNU Octave is a programming language that is primarily used for scientific computing and numerical computation. Julia is a programming language that might pose the greatest threat to Python in the development of AI and machine learning-based applications. Julia is like a digital camera specialized in a particular task. This language is designed for high-performance computing and numerical analysis. Speed is one of the important reasons why you should prefer Julia over Python.

**76.** The capabilities of strong statistical computing are found in the programming language named

a. Lisp

b. Julia

c. R

d. GNU Octave

(1) b only (2) a only

(3) d only (4) c only

---

**77.** The features like easy learning and rich set of libraries are witnessed in the programming language called

a. Prolog

b. Lisp

c. Julia

d. Scilab

(1) c only (2) d only

(3) b only (4) a only

78. Of all the languages referred to in the passage, the two programming languages which are less efficient than others in some respects are

a. Haskell and Julia

b. Python and Prolog

c. Lisp and R

d. Prolog and C++

(1) c only (2) d only

(3) b only (4) a only

---

79. Which of the following is the correct combination of programming language and its special features ?

a. Julia = low-level control and scalability.

b. Haskell = scientific computing and numerical computation.

c. Prolog = expert systems and NLP.

d. Lisp = high performance computing and numerical analysis.

(1) both a and d (2) b only

(3) c only (4) both a and c

---

80. Overall, the passage refers to ______ programming languages are used for developing AI and ML.

Which of the following correctly fills in the blank in the sentence above ?

a. ten

b. eleven

c. twelve

d. eight

(1) c only (2) a only

(3) b only (4) d only

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**81.** "If it rains, the match will be cancelled."
The sentence above exemplifies __________ Mood.

a. Subjunctive
b. Imperative
c. Indicative
d. Conditional

(1) d only (2) a only
(3) b only (4) c only

---

**82.** a. She may be attending the parent-teacher meeting.
b. She might be attending the parent-teacher meeting.
c. She could be attending the parent-teacher meeting.

In which of the sentence/sentences above do/does the underlined modal/s express/es a good possibility ?

(1) b only (2) a only
(3) c only (4) both b and c

---

**83.** 'It is time for the syllabi to be revised'.
Identify from the following the correct active structure corresponding to the sentence above.

a. It is time for revising the syllabi.
b. It is time to revise the syllabi.
c. It is time for the syllabi to revise.
d. It is time for the syllabi to be revised.

(1) c only (2) a only
(3) d only (4) b only

---

**84.** A simple sentence has only one subject and one ________________.

a. structure
b. pattern
c. predicate
d. sentence-order

(1) d only (2) c only (3) a only (4) b only

---

**85.** Choose the correct passive form of the sentence given below.

'I annoy him'

(1) He is annoyed with me.

(2) He is annoyed by me.

(3) He is annoyed with us.

(4) He is annoyed by us.

---

**86.** Choose the correct meaning of the underlined word in the following sentence.

'His shows are unique because he is completely ambidextrous.'

(1) The stage of growth between childhood and youth.

(2) One who can use both hands equally well.

(3) One who can live both on land and in water.

(4) One who flies a space vehicle.

---

**87.** Choose the correct sentences.

a. Shall we have some coffee ?

b. Please, you may post this letter for me ?

c. You may take off your hat, I can't see the screen.

(1) a only

(2) a and b only

(3) b and c only

(4) a, b and c

---

**88.** Choose the correct option and fill in the blank in the following sentence.

The boy is accused of ________ as he killed his own father.

a. suicide

b. matricide

c. patricide

d. homicide

(1) a only (2) d only (3) c only (4) b only

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**89.** 'Teetotaller' is a person who

a. takes alcoholic drinks.

b. eats all kinds of food.

c. drinks too much.

d. abstains from alcoholic drinks.

(1) a only (2) c only (3) b only (4) d only

---

**90.** Choose the appropriate word for the phrase.

'That which cannot be removed or rubbed off .'

(1) irreparable

(2) indelible

(3) inevitable

(4) infallible

---

**91.** 'Very few metals in the world are as costly as gold.'

Select the correct comparative degree of the above sentence.

(1) Gold is costlier than most other metals in the world.

(2) Gold is one of the costliest metals in the world.

(3) No other metal is as costly as gold in the world.

(4) Gold is more costlier than any other metal in the world.

---

**92.** Which of the following sentence is the 'Simple Sentence' ?

(1) He is unwell, so he cannot attend the office.

(2) He confessed his crime.

(3) He cannot speak, nor can he write.

(4) He confessed that he is guilty.

---

**93.** Identify the grammatically correct sentence from the following.

(1) Jyoti has always to hurry in the morning because she gets up so late.

(2) Jyoti always has to hurry in the morning because she gets up so late.

(3) Jyoti gets up so late has always to hurry in the morning.

(4) Jyoti is getting up so late having so hurry in the morning.

---

**94.** Identify the adverb clause underlined in the following sentence.

(1) They fought <u>as heroes do</u>.

(2) I expect <u>that I shall get a prize</u>.

(3) Here is the book <u>you want</u>.

(4) I fear <u>that I shall fail</u>.

---

**95.** 'ESPN is showing all the matches Live'. Which of the following is the correct passive structure corresponding to the sentence above ?

a. All the matches are shown on ESPN.

b. All the matches are being shown on ESPN.

c. All the matches are being shown Live on ESPN.

d. All the matches are being shown Live by ESPN.

(1) d only

(2) c only

(3) a only

(4) b only

---

**96.** Identify the suitable modals which indicate 'some kind of rule' in the following sentence. 'In Delhi even the pillion-riders ___________ wear a helmet.'

(1) must

(2) have to

(3) has to

(4) should

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**97.** a. Neither pride nor prejudice affect him.

b. Each of these qualities is to be found in him.

c. Either he or I am to be blamed.

Identify the correct sentence/s given above.

(1) Only a and b

(2) Only b and c

(3) Only c

(4) Only a and c

---

**98.** We shall go to Amritsar when my sister ____________ from Kolhapur.
Select the correct alternative from the following to complete the sentence meaningfully.

(1) returned

(2) will return

(3) returns

(4) will be returned

---

**99.** Choose the correct meaning of the underlined phrase from the given sentence.
'He refused my request <u>point-blank</u>'.

(1) Purposefully

(2) Indirectly

(3) Directly

(4) Politely

---

**100.** Which phrase represents the word "perseverance" ?

(1) "Never giving up"

(2) "Lack of motivation"

(3) "Easily perceived"

(4) "Severe expression"

---

**सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे.....)**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षा कक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्न-क्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**